


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शुक्रवार २९ नोव्हेंबर २०२४ | अंक ३५५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# फडणवीस की मराठा चेहरा; मुख्यमंत्री पदाचा होणार फैसला, मोदी-शहांकडून पुन्हा धक्कातंत्र?

## महायुतीचे वारू उधळले

**राज्यात महायुतीने भूतो न भविष्यती अशी कामगिरी करून दाखवली. महायुतीचे वारू उधळले. या लाटेत महाविकास आघाडी भुईसपाट झाली. त्यांना इतका मोठा झटका बसेल असे वाटले नव्हते. महाविकास आघाडीचा ५० जागांच्या आत खेळ आटोपला. तर महायुतीने २३० हून अधिकचा मॅजिक फिगर गाठला. त्यात भाजपाला १३२ जागांवर यश आले. भाजपा मोठा भाऊ ठरला. त्यानंतर शिंदे सेनेला ५७, अजित पवार गटाला ४१ जागा मिळाल्या**




## महिला मुख्यमंत्री?

भाजपामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची चर्चा आहे. तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांचे नाव पुढे रेटण्यात येत होते. या दोघांनी याविषयीचा निर्णय दिल्लीतून होईल हे स्पष्ट केले आहे. अनेकांना मोदी आणि शाह हे राज्यात धक्कातंत्र वापरण्याची शक्यता वर्तवत आहेत. काहींच्या मते लाडक्या बहिणींनी महायुतीला भरभरून मतं दिली. लाडक्या बहिणींच्या मताचा हा वाढीव टक्का महायुतीच्या विजयासाठी जोरकस ठरला. त्यामुळे ज्या मुद्याची राजकारणात चर्चा होत नाही, असाच मुद्दा अजेंड्यावर येऊ शकतो. कदाचित राज्यात महिला मुख्यमंत्री होऊ शकते. अर्थात या सर्व जर-तरच्या चर्चा आहेत. पण मध्यप्रदेशसह राजस्थानमध्ये भाजपाने यापूर्वी वेगळे प्रयोग करून सर्वांनाच धक्का दिला आहे. त्यामुळे राजकारणात मध्यप्रदेश, राजस्थान हा पॅटर्न का लागू होऊ शकत नाही? असा पण काही जणांचा दावा आहे.

राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री होईल की महायुतीचा मुख्यमंत्री असेल याविषयी आता चर्चा रंगली आहे. अजितदादांनी मुख्यमंत्री पदावर कोणतीच आडकाठी न ठेवता थेट भाजपाला, पर्यायाने देवेंद्र फडणवीस यांना पाठिंबा दिला. त्यानंतर दोन दिवस एकनाथ शिंदे हे पण दावेदार असल्याचा दावा करण्यात येत होता. त्यांच्या शिलेदारांनी या मुद्दाला हवा दिली. पण काल माध्यमांसमोर येत एकनाथ शिंदे यांनी या सस्पेन्सवर एकदाचा पडदा टाकला. अजित पवार यांच्यानंतर त्यांनी सुद्धा भाजपा जो निर्णय घेईल तो मान्य असेल असे जाहीर केले. पण भाजपा राज्यात पुन्हा धक्कातंत्र देण्याची चर्चा पण जोरात आहे. आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होणार की मराठा उमेदवार देणार असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. तीन च वर चर्चा आज महायुतीमधील दिग्गज नेते हे दिल्ली दरबारी उपस्थित असतील. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे दिल्लीत असतील. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत त्यांची संध्याकाळी पाच वाजता बैठक होत आहे. या बैठकीत महाराष्ट्र, मुख्यमंत्री आणि मराठा या तीन एमवर चर्चा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यापूर्वी भाजपाचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या खलबतं झाली. त्यावेळी सुद्धा हे तीन मुद्दे समोर असल्याचे समजते. देवाभाऊ की मराठा नेताराज्यात गेल्या वर्षीच्या सप्टेंबरपासून मराठा आंदोलन अधिक तीव्र झाले. मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात आरक्षणाची लढाई गाजली. त्यांच्या उपोषणामुळे सरकारने अनेकदा नमतं घेतलं. तरीही मराठा आंदोलक मनोज जरांगे यांचा भाजपा आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावरील रोष कमी झाला नाही. त्यांनी आता सुद्धा सरकार स्थापन झाल्यानंतर मराठा आरक्षणासाठी सामूहिक उपोषणाचा एल्गार दिला आहे. राज्यात ओबीसी आणि मराठा यांच्यातील दरी कमी करण्याचे काम काही नेत्यांनी केले आहे. काही नेत आजही सर्वसामावेशक आहेत.

## पुस सेवासहकारी सोसायटीचे संचालक कै रामराजे नीलकंठराव पवार यांचे निधन



परळी (वार्ताहर) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी विधानसभा अध्यक्ष किरण काका पवार यांचे चुलते व सेवा सहकारी सोसायटीचे संचालक कै रामराजे नीलकंठराव पवार यांचं गुरुवार दि २८.११.२०२४ रोजी दुपारी २ वाजता निधन झाले कै रामराजे पवार हे पाटबंधारे विभागात ३७ वर्षे नोकरी करून सेवानिवृत्त झाले होते ते राजकारणासोबतच सांप्रदाय क्षेत्रामध्ये पंचक्रोशीत नावाजलेले व्यक्तिमत्व होतं सर्वांशी हितसंबंध जपत मनमिळाऊ स्वभाव असल्याकारणाने घाटनांदुरबार ,बर्दापूर, पट्टीवडगाव ,अंबाजोगाई या परिसरामध्ये त्यांचा दांडगा संपर्क होता. ते मृत्यू समयी ७० वर्षाचे होते त्यांच्या अंत्यविधीला जन्मगाव पुस ता अंबाजोगाई येथे नातेवाईक मित्रपरिवार शेकडोच्या संख्येने उपस्थित होता.

## ग्राहकाकडून जाहिरात असलेल्या कॅरिबॅगचे पैसे घेतल्यामुळे
# फस्ट क्राय डॉट कॉमला १० हजाराचा दंड

**बीड (प्रतिनिधी)**- शहरातील एका ग्राहकाला फस्ट क्राय डॉट कॉमने सामान खरेदी केल्यानंतर जाहिरात असलेल्या कॅरिबॅगचे १० रुपये ५० पैसे घेतले त्यावेळी ग्राहकाने या पैशाबाबत विचारणा केली असता अरेरावीची भाषा फस्ट क्राय डॉट कॉमकडून वापरण्यात आली त्यामुळे ग्राहकाने मा.जिल्हा ग्राहक आयोग बीड यांच्याकडे तक्रार दाखल केली यावेळी ग्राहक आयोगाने दिलेल्या दि.२५ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या निकालात फस्ट क्राय डॉट कॉमला १० हजार रुपये दंड केला व कॅरीबॅगचे १०.५० पैसे निकालापासून ४५ दिवसात देण्याचे आदेशित केले.

याबाबत माहिती अशी की, पियुष गौतम कोटेचा यांनी बीड शहरातील नगरनाक्यावरील फस्ट क्राय डॉट कॉम मार्फत फ्रँन्चाईसीचे मालक १) सुमीत अभय समदरीया व २) काजल सुमीत समदरीया यांच्या दुकानातून त्यांच्या मुलांसाठी खरेदी केली होती. सदरील सामान खरेदी केल्यानंतर दुकानदाराने त्यांच्याकडून कंपनीची जाहिरात असलेल्या कॅरीबॅगचे १०.५० पैसे बिलात वसूल केले त्यांनी त्याबद्दल जाब विचारला असता त्यांना समाधानकारक उत्तर न देता अरेरावीची भाषा वापरली त्यामुळे पियुष गौतम कोटेचा यांनी सदरील सामनेवालाविरुद्ध बीड येथील ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली यानंतर ग्राहक आयोगाने सामनेवाला यांना नोटीस बजावणी केली त्यानंतर बीड येथील सामनेवाला सदरील प्रकरणात हजर



झाले व पुणे येथील मुख्य कार्यालयाचे अधिकारी सदरील प्रकरणात हजर न झाल्यामुळे सदर प्रकरणात त्यांच्या विरुद्ध एकतर्फा आदेश पारित करण्यात आला आणि सदरील प्रकरणाची सुनावणी होवून मा.ग्राहक आयोगाने फस्ट क्राय डॉट कॉम शाखा-बीड यांना व मुख्य कार्यालय पुणे यांना संयुक्तिकरित्या व स्वतंत्ररित्या १० हजार रुपये दंड केला व कॅरीबॅगचे पैसे निकाल दिनांकापासून ४५ दिवसात देण्याचे आदेशित केले. सदरील तक्रारदार यांच्यातर्फे ॲड.बालाप्रसाद सारडा यांनी काम पाहिले व त्यांनी राज्य आयोग यांचे न्यायनिवाडे मा.आयोगात दाखल करुन सदरील न्यायनिवाड्याचा ग्राहक आयोगाने विचार करुन सदर निकाल घोषित केला. यामुळे जाहिरात असलेल्या कॅरीबॅगचे पैसे आकारणायांना चांगलाच दणका बसला आहे.****




बीड : क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त शहरातील त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, माजी जि.प.सदस्य तथा सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, नामदेवराव दुधाळ, नितिन साखरे, नगरसेवक शुभम धुत, बिभिषण लांडगे, अर्जुन दळे, प्रा.लक्ष्मण गुंजाळ, मोहन गोरे, दिलीप बेदरे, निखिल शिंदे, नितिन राऊत, सागर पाटील, पी.आर.दुधाळ, गोरख यादव, जयराम राऊत आदी उपस्थित होते.

# परळी मतदारसंघातील जनतेच्या स्वाभिमानासाठी कायम संघर्ष करणार
## लोकशाहीचा गळा दाबून मिळवलेले यश हेच सत्ताधा-यांचे खरे अपयश - राजेभाऊ फड



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि स्वतः शरदचंद्र पवार साहेब हे सर्वसामान्य जनता, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी यांच्या नेहमीच बाजूने राहिले आहेत. सत्तेत असताना नागरिकांच्या हितासाठी अनेक लोककल्याणकारी निर्णय त्यांनी घेतले तर सत्तेच्या विरोधात असताना जनतेच्या समस्या सोडवून घेण्यासाठी कायम रस्त्यावर संघर्ष केला. आत्ताचे निवडून आलेले सत्ताधारी हे लोकशाहीचा गळा दाबून सत्तेत आले आहेत. ते त्यांचे यश नाही तर अपयश आहे. सत्ता असो किंवा नसो असाच जनसेवेचा वसा आम्ही पुढे चालू ठेवणार आणि जनतेचा स्वाभिमान टिकून ठेवण्यासाठी कायम संघर्ष करण्याची तयारी आम्ही ठेवली असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड म्हणाले आहेत.परळी विधानसभा मतदारसंघातील ज्येष्ठ, युवा आणि महिला स्वाभिमानी कार्यकर्त्यांची नव्याने मोठ बांधून पक्षाला मजबुती मिळवून देणार असून जनतेचा स्वाभिमान टिकवून ठेवण्यासाठी आणि शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाच्या समस्या शासन दरबारी मांडून सोडवून घेण्यासाठी आम्ही संघर्षाची तयारी ठेवली असल्याचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. मतदान यंत्रात फेरफार करून, बोगस मतदान करून, मतदारांना मतदान करण्यापासून रोखून मिळवलेली सत्ता ही स्वार्थासाठी मिळवलेली सत्ता असते. आत्ताचे निवडून आलेले सत्ताधारी हे लोकशाहीचा गळा दाबून सत्तेत बसलेले लांडगे आहेत. त्यांच्यापासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी जाणते राजे शरदचंद्र पवार साहेब सक्षम आहेत. त्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना कमकुवत समजण्याची चूक विरोधकांनी करू नये. सत्तेत नसलो म्हणजे आम्ही संघर्ष करायला विसरलो नाहीत. जनसेवेसाठी आम्ही सदैव रस्त्यावर कार्यरत राहून लोकांसाठी संघर्ष करू अशीही भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

# ई-पीक पाहणी प्रक्रीया पूर्ण करा
# शेतक-यांना लाभ मिळवण्यासाठी आवश्यक

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : शेतक-यांना कोणत्याही लाभासाठी यापुढे ई-पीक पाहणी प्रक्रीया पूर्ण करणे आवश्यक होणार आहे. त्यामुळे भविष्यातील सर्व लाभ मिळण्यासाठी ही प्रक्रीया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.संपूर्ण राज्यात रब्बी हंगाम २०२४ पासून ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (**DCS**) मोबाईल ॲप द्वारे पीक नोंदणी करावयाची आहे. दिनांक १ डिसेंबर २०२४ पासून राज्यातील सर्व गावांमध्ये रब्बी हंगाम २०२४ सुरू करण्यात येत आहे. या प्रकल्पात शेतकरी स्तरावरून व सहायक स्तरावरुन मोबाईल ॲपद्वारे पिकांची नोंद करण्यात येणार आहे. तदब अनुषंगाने रब्बी हंगाम २०२४ करिता शेतकरी स्तरावरील ई-पीक पाहणी दि.१ डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ हा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. त्याकरिता ई-पीक पाहणी (ऊउड) त ३.०.३ डाऊनलोड करावे. तसेच डिजीटल क्रॉप सर्वे (**DCS**) मध्ये गटाच्या हद्दीवर आधारित **Geo Fencing** बंधनकारक करण्यात आलेली आहे म्हणजेच जोपर्यंत संबधित खातेदार निवडलेल्या गटात जाऊन पीक पाहणी करत नाही तो पर्यंत पिकांचे छायाचित्र काढता येत नाही व पीक पाहणी ीिश्रिरव करता येत नाही. तरी जिल्हयातील सर्व शेतकरी बंधु-भगिनींना आवाहन करण्यात येते कि, त्यांनी रब्बी हंगाम २०२४ साठी ई-पीक पाहणी नोंदणी पूर्ण करावी जेणे करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यास अडचण येणार नाही.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २९ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



## नवनिर्वाचित आमदार संदीप क्षीरसागर यांना खुले पत्र

टीप – पत्र थोडे मोठे झाले आहे. तरी कृपया आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून संपूर्ण वाचावे. जेणेकरून आपल्याला यावर काम करण्यास सोपे जाईल. मा.आ. संदीप क्षीरसागर साहेब, सर्वप्रथम आपण बीड विधानसभा मतदारसंघातून लागोपाठ दुसऱ्यांदा निवडून आलात यासाठी आपले अभिनंदन आणि पुढील पाच वर्षाच्या कारकिर्दीसाठी खूप–खूप हार्दिक शुभेच्छा! आमदार साहेब, आपल्याला शंभर टक्क्यांनी पास होण्याची दुबार संधी मिळाली आहे. या खुल्या पत्राद्वारे आपल्या सेवेत काही कामे जी बीड शहरवासियांसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. त्याची यादी आपल्यासमोर मांडत आहे. यात नमूद केलेल्या कामांना आपण आमदारकीच्या दुसऱ्या टर्म मधील पहिल्या एकाच वर्षात पूर्ण करावे अशी विनंती आणि अपेक्षा करतो. आपल्याकडून जी कामे प्रथम प्राधान्याने होणे अपेक्षित आहे, त्यात प्रामुख्याने – १) खासबाग–मोमीनपुरा हा मोठा भाग जोडणारा बिंदुसरा नदीवरील नियोजित पूल निर्माण करणे. २) मोमीनपुरा येथील महेदवीया दायरा कब्रस्तान च्या संरक्षक भिंती बांधणे. ३) शहेनशहावली दर्गा रोडला नाल्यावरील पूल बांधणे. ४) बशीरगंज भागातील डीसीसी बँक ते बलभीम चौक आणि बलभीम चौक ते माळीवेस चौक या रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे. ५) राजुरी वेस ते कबाड गल्ली रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे. ६) बार्शी रोडवरील राष्ट्रवादी भवन ते नर्सरी रोड ला जोडणाऱ्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे. ७) संपूर्ण बीड शहराला चार दिवसाआड नियमितपणे पाणीपुरवठा करणे. ८) मुहम्मदिया कॉलनी आणि त्यातील अनेक उपनगर, मोमीनपुरा, इस्लामपुरा, बालेपीर, बांगरनाला, आमराई, चाऊस कॉलनी या भागातील रस्ते आणि नाल्या बांधणे. ही कामे आपल्याला मिळालेल्या दुसऱ्यांदाच्या आमदारकी मध्ये पहिल्या वर्षातच पूर्ण होणे आपल्याकडून बीड शहरातील एक नागरिक म्हणून अपेक्षा करतो आहे. आमदार साहेब, वर उल्लेख केलेली सर्व आवश्यक कामे ही आता उद्भवलेली नसून जेव्हा पहिल्यांदाच आपण २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत निवडून आला होता, तेव्हापासून ते आपल्या पहिल्या आमदारकीची ०५ वर्षे संपूनही ती तशीच पेंडिंग पडून आहेत. याचे आम्हा बीड शहरवासियांना मोठ्या प्रमाणात शल्य वाटते. जोपर्यंत ही सर्व कामे पूर्ण होणार नाहीत तोपर्यंत हे शल्य वाटतच राहणार आहे. आमदार साहेब, आपल्या पहिल्या आमदारकीची सुरुवातीची दोन वर्षे ही कोरोना काळात गेली. कोरोना काळ संपला तेव्हा आपण ज्या महाविकास आघाडीचे आमदार होता त्या महाविकास आघाडीची सत्ता गेली. नंतर राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले. या सर्व बाबी जनतेला माहित आहेत. परंतु सत्ता जरी नसली तरी आपण लोकप्रतिनिधी आहात आपल्या मागे लाखो मतदारांनी आपल्याला दिलेल्या मतांची ताकद आहे. ती ताकद दाखवून सत्ताधाऱ्यांकडून बीड विधानसभा मतदार संघासाठी कधी सामोपचाराने, कधी आक्रमक होऊन तर कधी भांडून जनतेसाठी आवश्यक असलेली कामे करून घ्यावीत अशी आपल्याकडून जनतेला अपेक्षा आहे. आपल्या सोबतीला बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे आहेतच. यामुळे सत्ताधाऱ्यांत नसलात तरी दोघांनी मिळून जनतेसाठी आवश्यक ती कार्ये युद्ध पातळीवर करावीत अशी एक लोकप्रतीनिधी म्हणून आपल्याकडून जनतेला अपेक्षा आहे आणि ती रास्तच आहे. आमदार साहेब, आपण बिंदूसरा नदीवरील पुलासाठी आपला पक्ष सत्तेत असताना बरीच धावपळ केल्याचे माहित आहे. परंतु धावपळीनंतर फलनिष्पत्ती होणे सुद्धा आवश्यक आहे. ती गेल्या पाच वर्षात झालेली नाही. बीड शहरातीलच मोमीनपुरा बायपास रोड लगत असलेल्या महेदवीया दायरा कब्रस्तान च्या संरक्षक भिंतीची दुरावस्था सुद्धा गेल्या दोन वर्षात आपल्याकडून दूर होऊ शकली नाही. विशेष म्हणजे आपण या कब्रस्तानचा दौरा करून संरक्षक भिंती बांधून देण्याचे आश्वासन २३ जानेवारी २०२३ ला दिले होते. ऐतिहासिक शहेनशाहवली दर्गा रस्त्यावर दर्गा पासून काही मीटर अंतरावर असलेल्या नाल्यावरील पुलाचा प्रश्नही भिजत घोंगड्यासारखा गेल्या अनेक वर्षांपासून पडून आहे. बशीरगंज भागातील डीसीसी बँक ते बलभीम चौक आणि बलभीम चौक ते माळीवेस चौक हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून खड्डे व धूळ युक्त झाला आहे. यामुळे या दोन्ही रस्त्यांवर असलेले दुकानदार, दुकानात काम करणारे कामगार अगदी जेरीस आले आहेत. खड्ड्यांमुळे वाहन चालक तर दुकान चालविणारे आणि दुकानात काम करणारे कामगार हे सतत उडणाऱ्या धुळीमुळे त्रस्त झाले आहेत. यामुळे अनेकांना श्वसन विकाराच्या समस्या सुद्धा जडल्या आहेत. म्हणून हा रस्ता युद्ध पातळीवर काँक्रिटीकरण करून बनविणे आवश्यक आहे. आमदार साहेब, गेल्या ५ वर्षांपासून आपल्या सोबत एखाद्या सावली सारखे आपले सारथ्य करणारे माजी आमदार सय्यद सलीम यांच्या घरासमोरून जाणाऱ्या राजुरी वेस ते कबाड गल्ली या रस्त्याची दुरावस्था सुद्धा अत्यंत वाईट झालेली आहे. हा रस्ता ही फुटा फुटावर खड्डे तसेच उडणाऱ्या धुळीचे माहेरघर झाला आहे. आता याच रस्त्यावर अद्यावत बांधण्यात आलेले बीड शहर पोलीस ठाणेही स्थलांतरीत करण्यात आले आहे. मुख्य म्हणजे सय्यद सलीम यांच्यासारखा सारथी असूनही ते गेल्या पाच वर्षाच्या कार्यकाळात आपल्याकडून हा रस्ता चांगला करून घेऊ शकले नाहीत. याचेही मोठे वैषम्य वाटते. आमदार साहेब, गेल्या जवळपास २५ ते ३० वर्षांपासून बार्शी रोडवर असलेल्या आपल्याच राष्ट्रवादी पक्षाच्या राष्ट्रवादी भवन पासून ते लक्ष्मण नगर मार्गे नर्सरी रोड कडे जाणारा हा रस्ता नेमका कुणाच्या पापामुळे की दुर्लक्षपणामुळे खितपत पडला आहे? याचाही काही ताळमेळ लागत नाही. या रस्त्यावर सहारा कॉलनी, अक्सा कॉलनी, शहेनशहा नगर सारख्या उच्चभ्रू वसाहती तसेच बीड नगर परिषदेकडून उजाड करून टाकण्यात आलेले लक्ष्मण नगर सारख्या वसाहती आहेत. विशेष म्हणजे या रस्त्याबद्दल आतापर्यंत अनेक नेत्यांनी अनेकदा आश्वासने सुद्धा दिलेली आहेत. तरीसुद्धा हा रस्ता तयार करण्यात येत नाही. याशिवाय मोमीनपुरा, इस्लामपुरा, बालेपीर, बांगरनाला, आमराई, चाऊस कॉलनी या भागातील ही अनेक रस्ते व नाल्या बांधणे आवश्यक आहे. आमदार साहेब, वर उल्लेख केलेल्या सर्व वसाहती या बीड शहरातीलच चाणक्यपुरी, भाग्यनगर, आनंदनगर, ज़मज़म कॉलनी सारखे चांगले रस्ते व नाल्यांनी चकचकीत व्हावे. तेव्हा ही सारी कामे आपल्याला मिळालेल्या दुस–या आमदारकीच्या पहिल्याच वर्षात पूर्ण करावीत. जेणेकरून उरलेल्या चार वर्षात पुन्हा दुसरी कामे करून बीड शहराला एक विकसित शहर म्हणून ओळख मिळवून द्यावी. आमदार साहेब, बीड शहराला पाणीपुरवठा करणारे पाली येथील बिंदुसरा धरण तसेच माजलगाव मधील जायकवाडी धरण तुडुंब भरलेले आहे. तरीसुद्धा बीड शहरवासीयांना कुठे आठ, कुठे पंधरा तर कुठे वीस–पंचवीस दिवसाआड पाणी सोडले जाते. असे का? नागरिकांनी प्रश्न केला तर उत्तर दिले जाते की, इट येथील फिल्टर प्लांट मध्ये बिघाड झाला किंवा तिथे वारंवार लाईट जात असल्याने पाणीपुरवठ्यास उशीर होत आहे. तेव्हा आपण ईट येथील फिल्टर प्लांटमध्ये जी काही नादुरुस्त यंत्रसामग्री असेल किंवा हातघाईला आलेली असेल ती बदलून तिथे विद्युत पुरवठा दरदिवशी २४ तास सुरळीत करण्यासाठी आवश्यक ते उपाय करावे. यासाठी आपल्या सोबत असलेले माजी आमदार सय्यद सलीम यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळेल. कारण त्यांनीच माजलगाव बॅक वॉटर चे पाणी बीड शहरापर्यंत आणून पाणीदार आमदार म्हणून ख्याती मिळविलेली आहे. त्यांना याबद्दलची इत्यंभूत माहिती आहे. त्यांच्यासोबत मिळून आपण संपूर्ण बीड शहराला यापुढे किमान चार दिवसाआड तरी नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक यंत्रणा लावावी. यावेळी निवडणूक काळात गेल्या वेळेस सारखेच माजी आमदार सय्यद सलीम आणि आपण जनतेला भरपूर आश्वासने दिलेली आहेत. ती पुर्ण करण्याची संधी जनतेने आपल्याला लाखाच्यावर मतदान करून उपलब्ध करून दिली आहे. तेव्हा जनतेच्या अपेक्षेवर खरे उतरल्यास २०२९ च्या निवडणुकीत सुद्धा हीच जनता आपल्याला प्रचंड बहुमताने निवडून देईल. आमदार साहेब, बीड शहरातील एक जबाबदार नागरिक म्हणून वर उल्लेख केलेली कामे आपल्याला दाखविणे माझे नैतिक कर्तव्य होते, ते मी पार पाडले आहे. आता यावर कार्य करून आपण आपले कर्तव्य पार पाडावे ही अपेक्षा. चूक–भूल द्यावी घ्यावी.

आपला एस.एम.युसूफ़ (मुक्तपत्रकार) आसेफ़नगर, बीड

# अभुतपुर्व निकाल, सर्वच अंदाज फेल

अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय या तीन शब्दात पंधराव्या विधानसभेच्या निकालाचे वर्णन करावे लागेल. अभूतपूर्व म्हणजे या पूर्वी कधीही घडले नाही असे. हो हा निकाल अभूतपूर्व असाच आहे कारण यापूर्वी असा निकाल महाराष्ट्राने कधीही पाहिला नव्हता. २०१४ च्या मोदी लाटेतही जे घडले नव्हते ते आता घडले. महायुतीने तब्बल दोनशे छत्तीस जागा जिंकत महाविकास आघाडीचा सुफडा साफ केला. महाराष्ट्रात महायुतीची लाट नव्हे तर त्सुनामी आली. या त्सुनामीत महाविकास आघाडीचे अनेक गड उध्वस्त झाले. महाविकास आघाडीच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभव पत्करावा लागला. ही त्सुनामी इतकी जबरदस्त होती की पाच महिन्यांपूर्वी जी महाविकास आघाडी अजिंक्य वाटत होती तिला अर्धशतक देखील गाठता आले नाही. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच विधानसभेला विरोधीपक्ष नेता देखील मिळणार नाही अशी अवस्था झाली. हे खरोखरच अभूतपूर्व असेच आहे. अनाकलनीय या अर्थाने की असा निकाल लागेल असा अंदाज कोणालाच आला नव्हता. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील राजकीय धुरिणांना असा निकाल लागेल असे वाटले नव्हते. खुद्द भाजप आणि महायुतीच्या नेत्यांना देखील हा इतका विराट मिळेल असे वाटले नसेल. भल्या भल्यांना विचार आणि अभ्यास करायला लावणारा असा हा निकाल आहे. महायुतीला या निवडणुकीत महाविकास आघाडीपेक्षा थोड्याफार जागा अधिक मिळतील असा अंदाज होता. महायुती कसाबसा सत्तेचा सोपान चढेल असा अंदाज होता निवडणूक पूर्व चाचणीत

ही तेच दाखवण्यात आले होते मात्र प्रत्यक्षात त्याहूनही खूप वेगळे घडले. अविश्वसनीय या अर्थाने की या निकालावर विश्वास ठेवणे अनेकांना अजूनही कठीण जात आहे. काहीजण या निकालावर अजूनही विश्वास ठेवायला तयार नाही कारण अवघ्या पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत पूर्णपणे वेगळे चित्र पाहायला मिळाले होते. महाविकास आघाडीने आश्चर्यजनक कामगिरी करत लोकसभेच्या ३० जागा जिंकत महायुतीला नामोहरण केले होते. अवघ्या पाच महिन्यात अशी काय जादूची कांडी फिरली की ज्याने इतका मोठा उलटफेर केला ? लोकसभेप्रमाणेच विधान सभेतही महाविकास आघाडीची सरशी होईल असा कयास काहीजण लावत होते त्यामुळेच या निकालावर त्यांचा विश्वास बसत नाही अर्थात कोणाचा विश्वास बसो अगर न बसो जनतेने दिलेला हा निकाल राजकीय पक्षांसह



सगळ्यांना स्वीकारावाच लागणार आहे. हा जनतेच्या न्यायालयाने दिलेला निकाल आहे तो स्वीकारूनच विरोधी पक्षांनी या निकालाचे आत्मचिंतन करायला हवे. या निकालाचे अवलोकन केले तर असे दिसून येते की लोकसभा निवडणुकीत झालेल्या पीछेहाटी नंतर महायुतीने त्या निकालाचे आत्मपरीक्षण करून त्यातील चुका आणि उणीवा दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीने सामूहिक प्रयत्न केला त्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नेहमीप्रमाणे साथ लाभली. लोकसभेच्या निवडणुकीनंतर भाजपच्या दिल्लीतील नेत्यांनी छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांनी एक होऊन प्रचाराचे अतिशय सूक्ष्म व काटेकोर नियोजन . याउलट माहविकास आघाडी लोकसभेच्या यशाने हुरळून गेली. लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही आपल्याला अनुभूती मिळेल या भ्रमात महाविकास आघाडीचे नेते बले त्यामुळे त्यांच्यात कोणताही समन्वय नव्हता. जागा टप असोत की प्रचार सभा महाविकास आघाडीची जूट कोठेच दिसली नाही. महाविकास आघाडीचे नेते आपल्यालाच मिळाली या थाटात एकमेकांशी भांडू गले. मुख्यमंत्रीपदावरून महाविकास आघाडीत सीखेच सुरू झाली.

महाविकास आघाडीतील बाष्कळ नेत्यांनी जी बोल बच्चनगिरी केली ती ही त्यांना नडली. लोकसभा निवडणुकीत झालेली पिछेहाटी नंतर महायुती खडबडून जागी झाली आणि महायुती सरकारने अनेक लोकाभिमुख योजना आणल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक योजना. या योजने अंतर्गत १५०० रुपये महिलांच्या खात्यावर जमा होऊ लागले. ही योजना महायुतीसाठी गेम चेंजर ठरेल असा अंदाज होता आणि तो खरा ठरला. यावेळी महिला मतदार मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या. महिला मतदारांची टक्केवारी पाच टक्क्यांनी वाढली. राज्यातील लाडक्या बहिणींनी विषयी नेत्यांनी जी बोल बच्चनगिरी केली ती ही त्यांना नडली. लोकसभा निवडणुकीत झालेली पिछेहाटी नंतर महायुती खडबडून जागी झाली आणि महायुती सरकारने अनेक लोकाभिमुख योजना आणल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक योजना. या योजने अंतर्गत १५०० रुपये महिलांच्या खात्यावर जमा होऊ लागले. ही योजना महायुतीसाठी गेम चेंजर ठरेल असा अंदाज होता आणि तो खरा ठरला. यावेळी महिला मतदार मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या. महिला मतदारांची टक्केवारी पाच टक्क्यांनी वाढली. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पदरात भरभरून मतांचे दान टाकले कदाचित त्यामुळेच महायुतीला इतका विराट विजय मिळवता आला. ज्या वेळी ही योजना आली त्यावेळी विरोधी पक्षांनी या योजनेवर टीका केली ही टीका कदाचित महिला मतदारांना रुचली नसावी. राज्यातील महिला मतदारांनी महायुतीला तारलेच नाही तर अक्षरशः उचलून धरले या सर्वांचा परिपाक म्हणजे महायुतीला मिळालेले हे घवघवीत यश. या निकालाने काँगेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या तिन्ही पक्षांना मतदारांनी नाकारून भाजप, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर विश्वास दाखवला आहे त्यामुळे या तिन्ही पक्षांना आता पुन्हा शून्यातून सुरुवात करावी लागेल. अर्थात एका पराभवाने कोणताही पक्ष संपत नसतो झालेल्या चुका दुरुस्त करून या पक्षाने २०२९ चे लक्ष समोर ठेवून पक्षाची बांधणी करावी लागेल. पक्षातील जुन्या बोल बच्चन नेत्यांना बाजूला सारून नव्या दमाचे कार्यकर्ते तयार करावे लागतील. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत त्यावर लक्ष केंद्रित करून या पक्षांनी तयारी सुरू करावी तर महायुतीने जनतेने दिलेल्या अभूतपूर्व यशाचा आदर राखत जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करून महाराष्ट्राला देशातील नंबर १ चे राज्य बनवण्यासाठी प्रयत्न करावेत.

## निर्णय दिल्लीचा

दिल्ली देशाच्या सत्तेचा केंद्रबिंदू होता ,आहे. आजपर्यंत काँग्रेस पक्षाने अनेक वर्षे सत्ता भोगली. देशातल्या विधानसभा निवडणुका झाल्ययानंतर जेव्हा काँग्रेस पक्षाला बहुमत मिळत असे तेव्हा पक्षाचा नेता आणि मुख्यमंत्री दिल्लीतून ठरवला जात असे. कोणाला पद द्यायचं आणि कोणाला कमी करायचं याचे सर्व अधिकार काँग्रेस पक्षाच्या दिल्लीश्वरांना असायचे. काँग्रेस पक्षाचं हायकमांड दिल्लीत असायचं. काँग्रेस पक्ष हायकमांडवर चालतं असं सातत्याने भाजप म्हणत असे. विशेष करून भाजपा घराणेशाहीचा आरोप काँग्रेसवर लावत असे. जे काँग्रेसने केलं तेच आता भाजपा करू लागलं. कुठल्याही राज्यामध्ये सत्ता बदल करायचा असेल किंवा मुख्यमंत्री बदलायचा असेल तर त्याबाबत निर्णय दिल्लीतच होतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह जे म्हणतील तीच पूर्व दिशा भाजपामध्ये आहे. त्या त्या राज्यातला भाजपा नेत्यांना आपला नेता निवडण्याचा कसलाही अधिकार नाही. विधानसभा निवडणुका पार पडल्या. भाजपा व महायुतीला पाशवी बहुमत मिळालं. बहुमत मिळाल्यानंतर नेता निवडीचा अधिकार आमदारांना असायला हवा. पण त्यांना कसलाही अधिकार नाही. आमदार फक्त नामधारी आहे. ना ते नेता निवडू शकतात, ना ते मुख्यमंत्री निवडू शकतात. मुख्यमंत्र्यांबाबतचा निर्णय दिल्लीतून होणार आहे. देवेंद्र फडणविस यांना मख्यमंत्री करायचं की अन्य कणालाहे अजून निश्चित झालं नसलं तरी फडणविस मुख्यमंत्री होतील असं वाटू लागलं आहे. दिल्लीच्या जे मनात आहे तोच महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झाल्याशिवाय राहणार नाही. मंत्रिमंडळाच्या बाबीतही तसाच निर्णय होऊ शकतो. कोणाला मंत्रीपद द्यायचं, भाजपाकडे किती, शिवसेना आणि राष्ट्रवादीकडे किती याचा निर्णय देखील दिल्लीमध्येच होणार आहे. मग एकीकडे लोकशाहीचा उदो उदो करायचा की आमच्या पक्षात एकाधिकारशाही चालत नाही असं म्हणायचं, दुसरीकडे हुकुमशाही वृत्तीनुसारच कारभार चलत असल्याचे दिसून येत आहे. पंतप्रधान मोदी आणि शाहा यांच्याशिवाय राज्याच्या भाजपात पानही हलत नाही. मग हे नेते आमदार, खासदार फक्त नावालाच आहेत का ? त्यांना जर अधिकारच नसेल तर मग का म्हणून त्यांनी इतका लोकशाहीवादी असल्याचा आव आणायला हवा ? काँग्रेसमध्ये यापूर्वी असंच होतं. त्याचीच पुर्नरावृत्ती भाजपामध्ये सुद्धा होत आहे. काँग्रेस सोडून भाजपामध्ये जे नेते गेले आहेत ते यावर आता एक शब्दही बोलू शकत नाही. घराणेशाही राजकारणाची परंपरा काँग्रेसने जोपसली तीच परंपरा भाजपाने आता पुढे रेटली. एका एका घरात दोन दोन तीन तीन आमदार, खासदार आहेत आता ते भाजपाला कसे चालतात. त्यावर आता भाजपाचे नेते का बोलत नाही. या घरंदाजाबाबत प्रश्न उपस्थित झाले पाहिजेत. एका घरात फक्त एकच पद असलं पाहिजे. नुकत्याच झालेल्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत अनेकांच्या घरात आमदारक्या, खासदारक्या आलेल्या आहेत. एकाच घरात सगळे पदे असतील तर इतर नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी का म्हणून कामकरायचे. त्यांनी आयुष्यभर सतरंज्याच उचलायच्या का? जोपर्यंत राजकारणाचा विस्तार सर्वत्र होत नाही तोपर्यंत सामान्य कार्यकर्त्यांना न्याय मिळणार नाही. असंच जर होत राहिलं तर सामान्य कार्यकर्ता तो आहे त्याच जागेवर राहिल आणि पुढा–यांची पिढ्यान पिढ्या पुढे जात राहणार आहे. महाराष्ट्रातलं राजकारण असेल किंवा इतर कुठल्याही राजकारणाचं असेल त्या राज्यातल्या राजकारणात स्थानिक नेत्यांना, आमदार, खासदारांना निर्णय घेण्याचा अधिकार नसेल तर याला लोकशाही म्हणायचं का याला सरळ सरळ हुकुमशाहीच म्हणायला हवी आणि ही हुकुमशाही सर्वच पक्षाच्या नेत्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना, आमदार, खासदारांना आवडू लागली. ही पद्धत चुकीची आह. चुकीच्या पद्धतीला पाणी घालणं म्हणजे लोकशाहीचं अधपतण केल्यासारखं आहे. लोकशाहीमध्ये सर्वांना समसमान अधिकार असतात पण आजच्या या राजकीय लोकशाहीमध्ये फक्त नावाला लोकशाही ठरू लागली आहे. फक्त बोलायचं एक आणि करायचं दुसरंच. अशा पद्धतीचा कारभार होत राहिला तर भविष्यामध्ये लोकशाही टिकेल असं मुळीच वाटत नाही. प्रत्येक व्यक्ती हा लोकशाहीचा भाग आहे. प्रत्येकांनी आपापली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडली तरच लोकशाही टिकू शकते नसता लोकशाहीचे भविष्यात अधपतण होऊ शकते. हे सांगायला एखाद्या भविष्यकाराची गरज भासणार नाही.

# महाविकास आघाडी मतदारानी का नाकारली ?,महायुती का स्वीकारली?

**(निवडणूक विश्लेषण):-**

महाराष्ट्रातील विधानसभा २०२४ च्या निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाले आहेत. राज्यातील जनतेने महायुतीला स्पष्ट मत दिलंय. महायुतीचे २०० पेक्षा अधिक उमेदवार विजयी झाले आहेत. तर दुसऱ्या बाजूला मविआला ५० जागाही मिळालेल्या नाहीत. महायुतीच्या झालेल्या या एकतर्फी विजयामुळे राजकीय विश्लेषकांकडूनही आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. याच महायुतीचा अवघ्या ६ महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत डब्बा गूल झाला होता. तर मविआचे सर्वाधिक उमेदवार विजयी झाले होते. मात्र फक्त ६ महिन्यात असं काय झालं? ज्यामुळे मतदारांनी त्यांचा निर्णय बदलत महायुतीला साथ दिली? हे आपण

काही मुद्द्यांमधून जाणून घेऊयात.महाराष्ट्रात अनेक टप्प्यांमध्ये लोकसभेचं मतदान झालं. महाराष्ट्रात एकूण ४८ लोकसभा मतदारसंघ आहेत. अर्थात महाराष्ट्रातून देशाच्या संसदेत ४८ खासदार निवडून जातात. या लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये ४८ पैकी मविआच्या ३१ उमेदवारांचा विजय झाला होता. तर विधानसभा मतदारसंघनिहाय पाहायचं झालं तर मविआ १५१ जागांवर आघाडीवर होती. मात्र ६ महिन्यांमध्येच जनमत बदललं.

**मविआला का नाकारलं ?**

राज्यात लोकसभा निवडणुकीत जो पक्ष जिंकतो, त्यांचंच सरकार बनवण्यात मतदार गेल्या २० वर्षांपासून निर्णायक भूमिका बजावत आला आहे. मात्र यांनी बंडखोरी करत पक्ष फोडला, असे आरोप करत विरोधकांनी हल्लाबोल केला. मात्र विरोधकांचा हा मुद्दा मतदारांना त्यांच्याकडे ओढू शकला नाही, हेच विधानसभेच्या निकालावरुन स्पष्ट होतं. मविआमध्ये जागावाटपावरुनही अनेक वाद पाहायला मिळाले. जागावाटपावरुन काँग्रेसचे नाना पटोले आणि ठाकरे गटाचे संजय राऊत यांच्यातही वाद पाहायला मिळाले.**विदर्भात काँग्रेस अपयशी**

राज्यातील सत्तेचा मार्ग हा विदर्भातून जातो, असं म्हटलं जातं. मात्र काँग्रेस विदर्भात सपशेल अपयशी ठरली आहे. काँग्रेसचे विदर्भातील मातब्बर नेत्यांचा पराभव झाला आहे. हिंदुत्वाच्या मुद्द्यासमोर जातीच्या राजकारणाराचा काहीच फरक निकालातून दिसला नाही. जनतेने जातीऐवजी धर्माला प्राधान्य दिल्याचं या निकालातून अधोरिखत झालं.

**लाडक्या बहिणींकडून परतफेड**

एकनाथ शिंदे सरकारने राज्यातील महिलांना अचूक हेरलं. लाडकी बहिण योजनेअंतर्गत दरमहिना दीड हजार रुपये दिले. तर जिंकून आल्यानंतर दर महिन्याला २ हजार १०० रुपये देण्याचं आश्वासन दिलं. महिलांनी मतदान केलं. राज्यातील मतदानाचा टक्का वाढला. या वाढीव मतदानाचा फायदा हा महायुतीला झालाय, हे निकालानंतर सांगण्यासाठी कोणत्या राजकीय पंडिताची गरज नाही. महायुतीला पुन्हा सत्तेत आणण्यात लाडक्या बहिणींनी गेमचेंजिंग भूमिका बजावली, असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही.

मोडकळीस झालेल्या इमारतींचा प्रश्न असो की झोपडपट्ट्यांचे एसआरए प्रकल्प असो. असे अनेक प्रश्न सध्या मुंबईला भेडसावत आहेत. त्यात मुंबई महापालिकेतील अर्थकारण हे सुद्धा महत्त्वाचे आहे. मुंबई महापालिकेचे उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत आहेत व प्रकल्पांवरील खर्च व उत्पन्न याचा ताळमेळ बसणे कठीण होत चालला आहे तसेच मुंबईकरांना सध्या नगरसेवक नसल्याने त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे हे कठीण होत चालले आहे. म्हणून लवकरात लवकर मुंबई महापालिकेच्या निवडणुका होणे आवश्यक आहे. मुंबईतील परिवहन सेवा असलेल्या बेस्ट सेवेचा बोजवारा उडला आहे. वाढत्या खाजगीकरणामुळे बेस्ट सेवेची अक्षरशः वाताहत झाली आहे. त्यात नगरसेवक नसल्यामुळे बेस्ट समिती नाही तसेच कोणताही कायम टिकणारा बेस्ट महाव्यवस्थापक बेस्ट उपक्रमाला मिळत नाही. त्यामुळे मुंबईकर प्रवाशांना सध्या दिव्यातून जावे लागत आहे. बेस्ट बसचा ताफा वाढत नाही. खासगी कंत्राटदार बेस्ट सोडून जात आहेत. अशा असंख्य समस्या बेस्ट पुढे आहे. म्हणूनच मुंबई महापालिकेच्या निवडणुका आता तरी घेणे गरजेचे आहे. केंद्रात भाजपाची सत्ता व राज्यातील भाजपा व महायुतीची सत्ता आहे त्यामुळे जर पालिकेच्या निवडणुका लवकरात लवकर घेतल्या, तर सत्ताधारी पक्षाला ते सोयीचे ठरणार आहे व मुंबईकरांच्याही ते सोयीचे ठरेल यात कोणतीच शंका नाही.

करावे असा दिलदारपणा महाआघाडीकडे नाही, हेच दिसून आले. जनतेने आपल्याला नाकारले आहे, हे महाआघाडीने मान्य केले पाहिजे व महायुतीच्या नव्या सरकारला राज्याच्या विकासासाठी साथ देण्याची तयारी दर्शवली पाहिजे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शुक्रवार २९ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# सोयाबीन पाठोपाठ कापूस उत्पादक शेतकरी संकटात-दत्ता वाकसे

वडवणी / प्रतिनिधी:- सध्या राज्यात विधानसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय वातावरण खूपच तापले असून ज्याला त्याला आपलीच पडली आहे. यात शेतकरी मात्र पूर्णपणे दुर्लक्षित असल्याचे चित्र दिसत आहे. सोयाबीन उत्पादक शेतकरी अल्प दरामुळे अडचणीत असताना आता कापसाचीही केवळ ७ हजार रुपये प्रति क्विंटल दराने व्यापारी खरेदी करीत असताना कापूस उत्पादक शेतकरी हवालदिल असून शेतकऱ्याचा वाली कोण असा संकुचित प्रश्न शेतकऱ्यासमोर असल्याची तिखट प्रतिक्रिया शेतकरीपुत्र शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी व्यक्त केली आहे. राज्यात यंदाच्या हंगामातील कापसाची खरेदी सुरू



झाली आहे. शेतकरी कपाशीच्या वेचणीसाठी मजुरांची शोधाशोध करीत आहेत शेतकऱ्यांना आधीच मजूर मिळणे कठीण झाले आहे. त्यात निवडणुकीच्या धामधुमीत मजुरांची टंचाई भासत होती तेव्हा मजुरांना कापूस वेचणीसाठी अधिक दराने म जुरी देऊन वेचून आणलेला कापूस मात्र शेतकऱ्यांना कमी दरात विकून मजुराची तजवीज करावी लागत आहे. मागील वर्षी ७ हजार ५०० रुपयाच्यावर न गेलेला कापसाचा दर दोन वर्ष आधी ९ हजार रुपये प्रतिक्विंटलाचे दर मिळालेला कापूस आज कवडीमोल भावात विकावे लागत असल्याने शेतकऱ्याने आता कोणत्या विकास आघाडीवर विश्वास दर्शवावा हाच कळीचा मुद्दा असल्याचे मतही दत्ता वाकसे यांनी व्यक्त केले आहे. सन २०१३ मध्ये डीएपीची बॅग ५६० रुपया मध्ये मिळायचीती आता १४०० रुपयाची झाली. त्यावेळी कापूस वेचणी ३ प्रतिकिलोती आता ८ ते १० प्रति किलो मजुरी शेतकऱ्यांना द्यावी लागत आहे. एकंदरीत शेतकऱ्यांच्या मालाला हमीभावाचे आश्वासन केवळ कागदापूर्तीच मर्यादित असल्याचे आरोपही वाकसे यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार चंद्रकात शेळके यांचा वाळू माफीयांना पुन्हा एकदा दणका.

**बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी नुकतीच वाळू माफीयांविरोधात कारवाई करत दोन हायवा जमा केल्या . यामुळे महसूल अधिकारी व कर्मचारी हे सतर्क झाल्याचे दिसून येत आहे . त्याचाच भाग म्हणून बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , त्यांचे अधिनस्त नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर हे दिवस रात्र गस्त घालत असून वाळू चोरीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे . बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी दि. २८ रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह पथक प्रमुख नायब तहसीलदार प्रशांत जाधवर व पथकाने पाली येथून केजकडे जात असताना नेकनूर रोडवर मांजरसुब्याजवळ अंदाजे ५ ब्रास अवैध वाळू वाहतूक करणारा एल पी ट्रक चक२३अण०४४९ पकडून**



**पोलीस स्टेशन नेकनूर यांचे ताब्यात दिला . सदर वाहनावर वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही करण्यात येईल असे तहसीलदार यांनी सांगितले . या वाहनाचे मालक प्रशांत नवले , राहणार पाली , तालुका जिल्हा बीड हे असून, ड्रायव्हर उमेश नेमाने हा आहे . या कार्यवाहीमध्ये मंडळ अधिकारी अशोक डरपे , मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे , पोलीस उपनिरीक्षक पवनसिंग जंघाळे , तलाठी विकास ससाणे , तलाठी संजय नेवडे , तलाठी अनिल गायकवाड , तलाठी कृष्णा रत्नपारखी , तलाठी अक्षय शिंदे , महसूल सहायक अमोल डोंगरे यांचाही सहभाग होता . जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी अशाच प्रकारच्या कारवाया जिल्हाभर सुरू ठेवण्याबाबत सर्व संबंधित विभागांना सुचित केलेले आहे . कोणीही अनधिकृत रित्या गौण खनिजाची वाहतूक करू नये तसेच नागरिकांनी सुद्धा अशा प्रकारची गौण खनिजाची अवैध वाहतूक होत असल्यास त्याबाबत संबंधित महसूल अधिकारी पोलीस अधिकारी यांना तात्काळ कळवावे असे बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांची हयगय केली जाणार नाही, असा इशारा दिलेला आहे . अवैधरित्या गौण खनिजाची म्हणजेच वाळू , मुरूम यांची वाहतूक करणारी वाहने दिसल्यास अथवा साठे आढळून आल्यास त्याची माहिती संबंधित मंडळ अधिकारी , तलाठी , पोलीस अधिकारी , पोलीस पाटील यांना तात्काळ द्यावी आणि नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे असे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आवाहन केलेले आहे . .*****.**

# नवनिर्वाचित गटविकास अधिकारी आर्पिता ठुबे यांचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सत्कार

केज/प्रतिनिधी
केज पंचायत समितीच्या नवनिर्वाचित गटविकास अधिकारी अर्पिता ठुबे यांचा सत्कार बहुजन वंचित आघाडीचे शरद धिवार व अमोल हजारे यांच्या वतीने करण्यात आला आहे. तसेच पंचायत समिती अंतर्गत चालू असलेल्या विविध योजना संबंधी संगोपान चर्चा करण्यात आली व नागरिकांची कामे लवकरात लवकर मार्गी लावावीत असे वंचितचे कार्यकर्ते धीवार व हजारे यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी गटविकास अधिकारी अर्पिता ठुबे यांनी मी आपल्या स्तरावरील जे कामे रखडलेले आहेत ती कामे तात्काळ मार्गी लावण्याचा प्रयत्न करेल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी पत्रकार तात्या गवळी व वसंत सोनवणे यांनी आपण केजच्या पंचायत समिती आवारातील व



इमारतीमध्ये जी घाण साचली होती ही तात्काळ मार्गी लावून सर्व कर्मचाऱ्यांना कार्यालयात सकाळी वेळेत हजर होण्याचे आदेश दिले आहेत या आपल्या कामाची दखल आमच्या चॅनलने/वृत्तपत्राने घेऊन आपल्या कामाची चुणूक आपण येताच दाखवली अशीच अपेक्षा आपणाकडून करतो अशा भावना व्यक्त केल्या येणाऱ्या काळात आपण गोरगरीब जनतेची कामे मार्गी लावावेत अशा विषयावर चर्चा करून गटविकास अधिकारी अर्पिता ठुबे मॅडम यांनी गटविकास अधिकारी पदाचा पदभार स्वीकारला आहे आपण आमच्या सत्काराचा स्वीकार करावा अशी शरद धीवार यांनी विनंती केली. धीवार यांच्या विनंती वरुन गटविकास अधिकारी मॅडम यांनी वंचित बहुजन आघाडीच्या सन्मानाचा स्वीकार केला. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते शरद धीवार, अमोल हजारे, पत्रकार वसंत सोनवणे, तात्या गवळी इत्यादी उपस्थित होते.

# आ.पंकजाताईच्या झंझावाती वादळामुळे ,मराठवाड्यात ४६ पैकी३६जागेवर महायुतीचे उमेदवार विजय



बीड । प्रतिनिधी लोकसभा निवडणुकीत भाजपसह महायुतीला मराठवाड्यात सपाटून मार खावा लागला होता. विधानसभेतही त्याची पुनर्रावृत्ती होते की काय असे वाटत असताना विखुरलेल्या ओबीसींची मोट बांधत भाजपच्या बाजुने केल्यामुळे मराठवाड्यात 46 पैकी 19 जागा भाजपला तर महायुतीला 36 जागा मिळाल्या आहेत. खऱ्या अर्थाने पंकजा मुंडे यांच्यामुळे भाजपला मराठवाड्यात चांगले दिवस आले असल्याचे दिसून येत आहे.मराठवाडा हा स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या काळापासून भाजपचा गड राहीला असून लोकसभा निवडणुकीसह विधानसभा आणि विधान परिषद निवडणुकीतही मराठवाड्याने भाजपला साथ दिली आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जरांगे फॅक्टरमुळे महायुतीचा मराठवाड्यात दारुण पराभव झाला होता. त्यानंतर विधानसभा निवडणुकीतही जरांगे फॅक्टरची जादू दिसून येईल, असे वाटत होते. मात्र मराठवाड्यात 46 पैकी भाजपने 19 विधानसभा मतदार संघात विजय मिळवला असून या मतदार संघातील ओबीसींची ताकद पंकजा मुंडे यांनी भाजपच्या बाजूने उभी केली होती. त्यामुळेच की काय भाजपला मराठवाड्यात पुन्हा चांगले दिवस आले आहे. महायुतीला 46 पैकी 36 जागा मिळाल्या असून मविआला मात्र केवळ 8 जागांवर विजय मिळवता आला आहे. बीड जिल्ह्यात सुध्दा भाजपने 2 जागा मिळवल्या असून लातूर, धाराशिव, नांदेड, जालना आणि परभणी जिल्ह्यात महायुतीला चांगले यश मिळाले असून पंकजा मुंडे याच खऱ्या अर्थाने किंगमेकर ठरल्या असल्याचे बोलले जात आहे.

# तेजज्ञान फाउंडेशनच्या ध्यान महोत्सवाची अंबाजोगाईत उत्साहात सांगता

-अंबाजोगाई (प्रतिनिधी):- तेजज्ञान फाऊंडेशनच्या मरजत जयंती ध्यान महोत्सवफ्चे आयोजन शहरातील लोकनेते गोपिनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे करण्यात आले होते. या महोत्सवाची उत्साहात सांगता झाली.ङ्घहॅपी थॉट्सफ नांवाने ओळखली जाणारी मतेजज्ञान ग्लोबल फाऊंडेशनफ ही आध्यात्मिक सेवाभावी संस्था आपल्या स्थापना दिनाच्या रौप्य महोत्सवी वर्षात प्रवेश करीत आहे. या विशेष प्रसंगी, फाऊंडेशन तर्फे रविवारी शहरातील लोकनेते गोपिनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे मरजत जयंती ध्यान महोत्सवफ (सिल्व्हर ज्युबिली सेलिब्रेशन) आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध डॉ. शंकर धपाटे (अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थशासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा रूग्णालय), अविनाश भारती (प्रसिद्ध व्याख्याते, युवा कवी तथा किर्तनकार) आणि प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. वनिता उन्हाळे मॅडम या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी




कार्यक्रमाच्या सुरूवातीस बोलताना धनंजय इंगळे यांनी तेजज्ञान फाउंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री यांचा आणि त्यांच्या आध्यात्मिक कार्याचा परिचय करून देत केली. त्यांनी उपस्थितांना तेजज्ञान फाउंडेशनच्या जागतिक शांततेसाठीच्या कटिबद्धतेचा उल्लेख करत, बाहेरच्या जगतात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रथमअंतर्मनात शांतता निर्माण करणे आवश्यक आहे, असे समजावले. जीवनात मस्वल्पविरामफ घेण्याचे महत्व पटवून देत,ङ्घहातातील मोबाइल काही वेळ बाजूला ठेवून ध्यानात बसल्यास,ध्यानाद्वारे आयुष्यात हा स्वल्पविराम निर्माण होईल आणिआपल्या सर्वोच्च आनंदाचा, मस्व-अनुभवफहोईल,ङ्घ असे इंगळे म्हणाले. तर प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. वनिता उन्हाळे मॅडम यांनी तेजज्ञान फाऊंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री यांनी जीवनातध्यान व आध्यात्मिक साधनेचे महत्त्व पटवून देत लाखो लोकांच्याजीवनात आनंद आणि शांती निर्माण केली आहे असे सांगूनतेजज्ञान फाउंडेशन तर्फे आयोजित या ध्यान महोत्सवाच्या माध्यमातून जगभर शांतता आणि आनंद पसरविण्याच्या उद्दिष्टाला एक नवीन दिशा देण्यात आली असल्याचे उन्हाळे मॅडम यांनी सांगितले. या प्रसंगी डॉ. शंकर धपाटे आणि अविनाश भारती यांनी ही तेजज्ञान फाऊंडेशनच्या वतीने मरजत जयंती ध्यान महोत्सवफ्चे उत्तम आयोजन केल्याबद्दल कौतुक केले. तसेच त्यांनी आपल्या विचारांतून उपस्थितांना संबोधित केले आणि साधनेसाठी प्रेरणा दिली. या कार्यक्रमात तेजगुरू सरश्री यांचा ध्यानावर मार्गदर्शन करणारा व्हिडिओ संदेश दाखविण्यात आला. सरश्रींनी यात ध्यान का आणि कसे करावे, तसेच ध्यानाचे वरवरचे तसेच अंतिम लाभ म्हणजे ममी कोण आहे?फ या प्रश्नाचे उत्तर शोधणे, यावर प्रकाश टाकला. ङ्गमी कोण आहे ?ङ्घ हा शोध घेणे मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सर्व उपस्थितांना २१ मिनिटांचे ध्यान अनुभवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले, ज्यातून उपस्थितांना मस्व-अनुभवफ मिळाला. या कार्यक्रमाला १०० पेक्षा अधिक साधक आणि नागरिक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय इंगळे यांनी रंगतदार पद्धतीने केले आणि फाउंडेशनच्या २५ वर्षांच्या प्रवासाची ओळख उपस्थित श्रोत्यांना करून दिली. कार्यक्रमाच्या समारोपात, जवळपास सर्व उपस्थितांनी २१दिवसांचे ध्यान चॅलेंज घेण्याचा संकल्प व्यक्त केला. तेजज्ञान फाउंडेशन तर्फे अशा प्रकारचे कार्यक्रम भारतातील सुमारे १२५ शहरांमध्ये आयोजित करण्यात आले आहेत, ज्यामुळे संपूर्ण देशभर ध्यानाच्या माध्यमातून शांतता आणि आनंदाचे सशक्त वातावरण निर्माण होत आहे हे उल्लेखनीय आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तेजज्ञान फाऊंडेशन, शाखा अंबाजोगाईच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

# केज येथे संविधान गौरव व शहीद पोलिसाना अभिवादन

**केज/प्रतिनिधी**
:- केज येथील पोलीस बॉईज संघटना, रोटरी क्लब ऑफ केज व सर्वज्ञ अकॅडमी यांच्या वतीने केज शहरात श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पोलीस स्टेशन अशी भव्य कँडल मार्च काढून संविधान गौरव व मुंबई हल्ल्यात अतिरेक्यांशी लढताना



शहीद झालेल्या पोलिस जवानांना अभिवादन करण्यात आले. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, पत्रकार गौतम बचूटे यांनी भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचे महत्व सांगितले. त्यानंतर छत्रपती शिवाजी चौकातून हातात कँडल व तिरंगा ध्वज घेऊन पोलिस स्टेशन पर्यंत रॅली काढण्यात आली.रॅलीमध्ये केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, प्रोजेक्ट चेअरमन असरार कुरेशी, बापूराव सिंगण, महेश जाजू, पीएसआय राजेश पाटील, सपोनि शिंदे, सतीश डांगे, इंगळे, विनोद गुंड, अनिल ठोंबरे, सर्वज्ञ अकॅडमीचे संचालक बांगर, अकडेमीचे व एमआयटी क्लासेसचे विद्यार्थी उपस्थित होते. समारोप स्थळी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, हनुमंत भोसले, रोटरीचे सचिव अनंत तरकसबंद महेश जाजू, पत्रकार गौतम बचुटे, सर्वज्ञ अकॅडेमीचे बांगर यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २९ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# अवहेलना सहन करुन देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले: छगन भुजबळ काय म्हणाले?

## भाजपचे सर्वाधिक आमदार आहेत. त्यामुळे भाजपचा मुख्यमंत्री होणार आहे. त्यात आक्षेप घेण्यासारखे काहीच नाही.

**आष्टी प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी राज्यातील सरकार स्थापनेबाबत महत्वाचा दावा केला आहे. राज्यात महायुतीमध्ये तीन पक्ष आहेत. ज्या वेळेस ३ पक्षांची युती असते तेव्हा सगळ्यांशी चर्चा करून निर्णय घ्यावा लागतो. त्या निर्णयासाठी काही वेळेस महिना, महिना देखील लागला आहे. त्या मनाने हा वेळ काहीच नाही. येत्या दोन-चार दिवसांत शपथविधीचा कार्यक्रम होणार आहे. त्यासंदर्भातील फॉर्म्युला आज निश्चित होणार आहे. भाजपचे १३२ आमदार निवडून आले आहेत, त्यामुळे त्यांचे मंत्री जास्त असणार हे स्वाभाविक आहे, असे भुजबळ यांनी सांगितले. मोठ्या वर्गाची मते मिळाली नाही
ओबीसींच्या हक्कावर गदा येऊ नये यासाठी मी काम केले. त्यामुळे काही लोक मला प्रचंड टार्गेट करत आहे, असे भुजबळ यांनी सांगितले. ते म्हणाले, निवडणुकीत मनोज जरांगे स्वत: माझ्या मतदार संघात फिरत होते. रात्री २ वाजेपर्यंत ते बैठका घेत होते. जरांगे यांच्या आवाहनाला प्रतिसाद मिळाला. मला एका मोठ्या वर्गाची मते मिळाली नाही.ईव्हीएमवर घोळाचा आरोपाला भुजबळ यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, लोकसभेला ईव्हीएम बरोबर होते. आता त्याच्यात गडबड आहे. आपल्या पराभवाचे खापर दुस-यावर फोडण्याचा हा प्रकार आहे. ईव्हीएम निर्जीव वस्तू आहे, त्याच्यावर खापर फोडणे सोपे आहे. २०१९ मधील विधानसभा निवडणुकीत मला ५६ हजारांचे मताधिक्य होते. मग आता माझे मतदान २ लाखांपर्यंत जायला हवे होते. ईव्हीएममध्ये



गडबड असती तर मला एक लाख जास्त मते मिळायला हवी होती. मग माझे मताधिक्य कमी का झाले? असे भुजबळ यांनी सांगितले.

### फडणवीस यांचे भरभरुन कौतूक

भाजपचे सर्वाधिक आमदार आहेत. त्यामुळे भाजपचा मुख्यमंत्री होणार आहे. त्यात आक्षेप घेण्यासारखे काहीच नाही. यापूर्वी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी बाहेरुन काम करणार असल्याचे सांगितले. परंतु पक्षाने आदेश दिला आणि ते उपमुख्यमंत्री झाले. त्यावेळी ती एक प्रकारची अवहेलना सहन करून ते उपमुख्यमंत्री झाले. परंतु त्यांनी पूर्णपणे कामाला झोकवून दिले. आता महायुतीला पूर्ण बहुमत मिळून देण्याचे काम त्यांनी केले. सर्व मागासवर्गीय आणि ओबीसी यांच्या अधिकारांवर कुठे गदा येऊ नये यासाठी फडणवीस यांनी सहकार्य केले आहे, असे भुजबळ यांनी म्हटले आहे.

# आत्ता कार्यकर्त्यांना वेध लागले जिल्हापरिषद पंचायत समितीचे

आत्ता कार्यकर्त्यांना वेध लागले –केज/प्रतिनिधी :–निवडणुकीचा धुरळाखाली बसला असला तरी गेल्या २ वर्षापासून बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका प्रलंबित आहेत त्या कधी निवडणुका लागणार याकडे इच्छुक कार्यकर्त्यांचे आता लक्ष लागलेले आहे. बीड जिल्ह्यात एकूण १०३३ ग्रामपंचायती आहेत, बीड जिल्ह्यात १२३३ गावे आहेत.बीड जिल्हा परिषदेत पूर्वी ६० गट होते.नवीन रचनेनुसार आता जिल्ह्यात ९ जिल्हा परिषद गट वाढले आहेत. शिरूर आणि धारूर तालुके वगळता इतर सर्व तालुक्यांमध्ये प्रत्येकी १ जिल्हा परिषद गट वाढणार आहे. प्रत्येक गटात ? पंचायतसमिती गण असतात, त्याप्रमाणे ९ तालुक्यात २ पंचायत समिती गण वाढणार आहेत.तालुकानिहाय गट संख्या बघितली तर आष्टी ८, पाटोदा ४, शिरूर ४. गेवराई १०, माजलगाव ७, वडवणी ३, बीड ९, केज ७, धारूर ३, परळी ७ आणि अंबाजोगाई ७ अशी एकूण ६९ गट निर्माण झालेले आहेत. तसं बघितलं तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका होण्याच्या कार्यकाळाला आता २ वर्ष झाली आहेत. मात्र, अद्यापही निवडणुका जाहीर झाल्या नाही. त्यामुळे इच्छुक उमेदवारांचा जीव टांगणीला लागला आहे.उमेदवारी मिळेल या हेतूने अनेकांची तयारी आहे. मात्र, अद्यापही या निवडणुकांना सरकारकडून काहीच निर्णय होत नसल्याने इच्छुकांच्या नजरा याकडे लागल्या आहेत.जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवसेंदिवस लांबणीवर पडत असून कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता दिसून येत आहे. राज्यात राजकीय खेळ पाहता नेमके कोणाशी निष्ठावान राहावे, कोणासोबत जावे, कोणत्या पक्षात काम करावे, हा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला असून कार्यकर्ते संभ्रमात आहेत. गुडघ्याला बांशिग बांधून निवडणूक रिंगणात उतरण–या इच्छुकांची कोंडी झाली आहे. ओबीसी आरक्षणामुळे निवडणुकालांबणीवर पडल्या आहेत. परिणामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषदेवर प्रशासकांची नियुक्ती झाली आहे. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद गटनिहाय आरक्षण, गट, गणरचना तसेच जिल्हा अध्यक्षपदाचे आरक्षण या सर्व बाबींची तयारी केली होती. परंतु ओबीसी आरक्षणामुळे निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत . ग्रामिण भागातील गावांच्या विकासाचा केंद्रबिंदू म्हणून जिल्हा परिषद व पंचायत समिती या संस्थाकडे पाहिले जाते. मात्र, निवडणुका लांबणीवर पडल्याने याचा फटका ग्रामीण भागातील जनतेला बसत असून अनेक विकासकामे ठप्प झाली आहेत. त्यातच आरक्षणाच्या गोंधळामुळे अनेक इच्छुकांना राजकीय निर्णय घेणे अवघड झाले आहे. ग्रामीण भागातील जनतेच्या हितासाठी लवकरात लवकर निवडणूक घेतली जावी, अशी मागणी कार्यकर्त्यां मधून होत आहे.केज विधानसभेचा जर विचार केला तर केज मतदारसंघात नांदुर घाट, विडा, चिंचोली माळी, आडस, युसुफ वडगाव, होळ, बनसारोळा हे गट आहेत जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी अनेक इच्छुक कार्यकर्ते महायुतीच्या नवनिर्वाचित आमदार नमिता मुंदडा यांच्यासाठी प्रचारात सक्रिय होते तर महाविकास आघाडीचे कार्यकर्ते हे पृथ्वीराज साठेंच्या प्रचारात सक्रिय होते.

# लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेज केज येथे महात्मा जोतीबा फुले पुण्यतीथी साजरी




केज/प्रतिनिधी: – के ज – शहरापासुन जवळच बीड रोडवर असलेल्या लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेजमध्ये दि.२८ नोव्हेंबर गुरुवार रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळी या शैक्षणीक संस्थेचे अध्यक्ष रमाकांत (बापू) मुंडे, प्राचार्य रवि पवार, शिक्षक आणि विद्यार्थिनी व विद्यार्थी उपस्थित होते.केज शहरापासुन जवळच असलेल्या बीड रोडवरील लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेजमध्ये दि.२८ नोव्हेंबर गुरुवार रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले याची पुण्यतिथी साजरी करुनअभिवादन करण्यात आले. सिध्दीविनायक शैक्षणिक सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमाकांत (बापू)मुंडे यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य रवि पवार, दुध डेअरीचे चेअरमण बापूसाहेब मुंडे, श्रीधर खोत, सतीष मुंडे, मॅनेजर शंकर नाईकनवरे, पत्रकार महादेव गायकवाड, अंकुश मुंडे, चौरेयांच्यासह शिक्षक इतर कर्मचारी सोनवणेताई, विद्यार्थीनी आणि विद्यार्थीउपस्थीत होते.

# ऊस वाहतूक करणा–या बैलगाडी, टॅक्टर यांना रेडियम रिफ्लेक्टर लावण्याची मागणी

केज /प्रतिनिधी:–केज तालुक्यात दोन साखर कारखाने आहेत. दोन्ही कारखाने सुरु झाले आहेत, ऊस उत्पादक शेतकर्यांसाठी आनंदाची गोष्ट आहे. पण रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणार्या बहुतांश – वाहनांच्यापाठीमागे रेडियम अथवा रिफ्लेक्टर लावलेले दिसून येत नाही. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी कारखाना संचालक – यांनी याची सक्ती करुन होणारे अपघात टाळावेत.दिवसेंदिवस रोडवरील अपघातांची संख्या वाढत आहे. वाढती अपघाताची संख्या कमी करण्यासाठी वाहतूक नियमांची – जनजागृती तसेच त्यावर विविध
उपाययोजना होणे गरजेचे आहे. सद्या साखर कारखाने सुरु झाले आहेत. रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक व करणार्या वाहनांमुळे अनेक अपघात झालेली आहेत. या अपघातामध्ये अनेक निष्पाप बळी गेलेले आहेत. त्यामुळे साखर कारखानदार यांनी कारखान्यावर येणा–या प्रत्येक ऊस वाहतूक वाहनांच्या मागे रेडियम, रिफ्लेक्टर लावणे सक्तीचे करावे. तसेच वाहतूक विभागाकडून वाहतूक नियमांचे पालन न करणार–या ऊस वाहतूक वाहनांवर कडक कार्यवाही होणे गरजेचे आहे. तसेच ऊस वाहतूक करणार्या वाहन चालकाने वाहतूकीच्या नियमाचे काटेकोटरपणे पालन करुन वाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावण्याबाबत वाहन चालक व मालक यांना सुचना देण्यात याव्यात अशी मागणी पुरोगामी पत्रकार संघ केज यांनी आज तहसील कार्यालय येथे निवेदन देऊन करण्यात आली आहे. यावेळी पुरोगामी पत्रकार संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय मुजमुले, केज तालुका अध्यक्ष रणजित घाडगे, केज तालुका सचिव दिनकर जाधव, पत्रकार जयद्रथ गायकवाड यांची उपस्थिती होती. ऊस वाहतूक करणारे वाहने सद्या रोडवर बर्याच ठिकाणी रात्रीच्या वेळी बंद पडलेल्या आवस्थेत पहावयास मिळत आहेत. परंतु अशा वाहनांना यांच्याकडे मागणीवाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावण्याबाबत वाहन चालक व मालक यांना सुचना देण्यात याव्यात अशी मागणी पुरोगामी पत्रकार संघ केज यांनी आज तहसील कार्यालय येथे निवेदन देऊन करण्यात आली आहे. यावेळी पुरोगामी पत्रकार संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय मुजमुले, केज तालुका अध्यक्ष रणजित घाडगे, केज तालुका सचिव दिनकर जाधव, पत्रकार जयद्रथ गायकवाड यांची उपस्थिती होती.ऊस वाहतूक करणारे वाहने सद्या रोडवर बर्याच ठिकाणी रात्रीच्या वेळी बंद पडलेल्या आवस्थेत पहावयास मिळत आहेत. परंतु अशा वाहनांना रेडियम किंवा रिफ्लेक्टर लावलेले नसतात, यामुळे अपघात घडतात आणि यामाध्ये निष्पाप वाहनधारकांचे नुकसान होते. त्यामुळे आम्ही केज तहसिलदार यांच्या कार्यालयास निवेदणाद्वारे उचित कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.



# शेतक–यांचे विजेच्या मागणीसाठी राज्य महामार्गावर दोन तास ठिय्या आदोलन

केज, दि. २७ (प्रतिनिधी):– केज तालुक्यातील कोरेगाव येथे शेतातील कृषी पंपासाठी लागणारा विद्युत पुरवठा व गावातील सिंगल फेज विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा. या मागणीसाठी काल दि. २७ रोजी बुधवारी सकाळी कोरेगाव येथील शेतकरी व गावक–यांनी केज – बीड राज्य महामार्गावरील क–ोरेगाव बस थांब्याजवळील राज्य महामार्गावर तब्बल दोन तास रास्ता रोक–ो आंदोलन करत शेतकऱ्यांनी रोडवरच ठिय्या मांडला. त्यामुळे काहीकाळ या महामार्गावरील वाहतुकीचा चांगल–ाच खोळंबा झाला होता. दरम्यान वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सदर माणण्याबाबत वरिष्ठांना कळवून त्या–ची लवकरात लवकर पुर्तता करण्या–चे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.



या बाबतची माहिती अशी की कोरेगाव येथे मागील चार ते पाच दिवसा पासून शेतातील कृषी पंपाची वीज सुरळीत नसून फक्त पाच ते दहा मिनिट वीज राहते आणि नंतर लागलीच वीज जात आहे. यामुळे शेतकरी त्रस्त आहेत. तसेच गावातील सिंगल फेज वीज पुरवठा ही बंद आहे. यामुळे येथील संतप्त नागरिकांनी दि.२७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता महावितरण कंपनीच्या ढिसाळ कारभारा विरुद्ध रोष व्यक्त करीत केज–बीड राष्ट्रीय महामार्गावर कोरेगाव पाटी जवळ तब्बल दोन तास रास्ता रोको आंदोलन के–ले. या आंदोलनात शेतकरी व नागरिक यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महावितरण कंपनीचे उप–अभियंता सय्यद साहेब, कनिष्ठ अभियंता महेश अंडील साहेब यांनी आंदोलन स्थळी भेट दे–ऊन आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांबाबतचे निवेदन स्विकारुन सर्व मागण्या वरिष्ठांना कळविण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आंदोलन मागे घेतले,

# जवरला येथे शामा कोलाम जयंती व संविधान दिन साजरा



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : २६–नोव्हेंबर रोजी श्यामा कोलाम यांची जयंती व संविधान दिन जवरला ग्रामस्थांच्या वतीने साजरा करण्यात आला.प्रारंभी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रपुरुष बिरसा मुंडा शामा दादा कोलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.
तर आदिवासी पुरुष शामा दादा कोलाम यांची जयंती जवरला ग्रामस्थांनी उत्साहात साजरी केली.यावेळी सरपंच नमिताताई गेडाम उपसरपंच संतोष चांदेकर अरविंद उर्वते, लक्ष्मण आत्राम यांच्यासह शामा दादा कोलाम समितीचे पदाधिकारी कार्यकर्ते ग्रामस्थ समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com